# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 10/10/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

प्रत - प्रमुख लिपीक- पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वाचक शाखा (पोअ यवतमाळ.)

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

# निरंक

# भाग २ - रजा

क्रमांक : पोअय/आली-4/प्रसुती रजा/मपोशि1970-1948 / 11617 /2019 यवतमाळ दिनांक

10 OCT 2019

आदेश

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महीला पोलीस कर्मचारी यांना त्यांचे प्रसुतीकरीता महाराष्ट नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम 74 चं तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अ.रजा/1409/प्र.क्र.108/2009/सेवा-6 दिनांक 24/08/2014 अन्वये रजेवर सोडल्याचे तारखेपासुन 180 दिवस प्रसुती रजा विशेष रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | नेमणुकीचा दिनांक | नेमणुक |
|---|---|---|---|
| 1 | मपोशि/1970 सरोज रोडगे | बाभुळगाव | 06.10.2007 |
| 2 | मपोशि/1948 वर्षा पाईकराव | वसंतनगर | 07.10.2007 |

(मा.पोअ.यांचे मान्यतेने)

(अनिलसिंह गौतम)
पोलीस उपधिक्षक मुख्या
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

प्रति

ठाणेदार पो.स्टे.बाभुळगाव/वसंतनगर

प्रत :- मपोशि/1970 सरोज रोडगे/मपोशि/1948 वर्षा पाईकराव मार्फत : ठाणेदार पो.स्टे.बाभुळगाव/वसंतनगर

प्रत :राजपत्र लि यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

11605

क्र : पोअय/प्रलि/५१-डी/रोखीकरण-सन-२०१९-२०/पो.अधिकारी/ /२०१९ यवतमाळ, दिनांक :- 10 OCT 2019

## आदेश

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र : एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५ (ब), दि.२७-०२-२००४ अन्वये पोलीस दलातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक दर्जापर्यतच्या अधिका-यांना एका वित्तिय वर्षात १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पण करण्यास शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरुन खालील पोलीस अधिकारी यांना वित्तीय वर्ष-२०१९-२० करीता शासकीय नियमानूसार १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पित करण्यांस मंजुरी प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | पोनि/धर्मा सुदाम सोनुने | पो.स्टे. मुकुटबन |
| २. | पोनि/श्याम श्रीराम सोनटक्के | पो.स्टे. राळेगाव |
| ३. | पोनि/आनंद वागतकर | पो.स्टे. अवधुतवाडी |
| ४. | पोनि/नितीन मधुसुदन गावंडे | बिनतारी संदेश विभाग |
| ५. | पोनि/जगदिश शिवाजी मंडलवार | पो.स्टे. मारेगाव |
| ६. | पोनि/ संजय मनोहराव शिरभाते | एएचटियु कक्ष |
| ७. | सपोनि/ निखील फटिंग | पो.स्टे. वणी |
| ८. | सपोनि/मुरलीधर जयराम गाडामोडे | पो.स्टे. वणी |
| ९. | सपोनि/ अमोल कृष्णाजी मुडे | पो.स्टे.राळेगाव |
| १०. | सपोनि/निलेश निवृत्ती गोपाळचावडीकर | पो.स्टे. पुसद ग्रामीण |
| ११. | सपोनि/संदीप उत्तमराव एकाडे | पो.स्टे. पुसद शहर |
| १२. | सपोनि/विजय रमेश रत्नपारखी | पो.स्टे. पुसद शहर |
| १३. | सपोनि/ब्रिजपालसिंह रा. ठाकुर | उपजिल्हा वाहतुक शाखा पुसद |
| १४. | सपोनि/विनोद दिलीप चव्हाण | स्थानिक गुन्हे शाखा |
| १५. | पोउपनि/शशिकांत चंदर दोडके | पो.स्टे. वसंतनगर |
| १६. | पोउपनि /गिरीष मोगलाजी तोगरवाड | पो.स्टे. वडगाव |
| १७. | पोउपनि/धिरज पांडुरंग राऊत | पो.स्टे. नेर |
| १८. | रापोउपनि/ संजीव महादेवराव नागे | पोलीस मुख्यालय |
| १९. | पोउपनि/ आशिष सुभाष राठोड | पो.स्टे. पोफाळी |
| २०. | परि. पोउपनि/ आकाश महल्ले | पो.स्टे. अवधुतवाडी |
| २१. | पोउपनि/अमोल मारोती चौधरी | पो.स्टे. मारेगाव |
| २२. | पोउपनि/दिलीप गोपीचंद पोटभरे | पो.स्टे. राळेगाव |
| २३. | पोउपनि/ अविनाश ल. इंगळे | वाचक उपविभागीय अधिकारी दारव्हा |
| २४. | पोउपनि/ दामोदर सुखदेवजी शेंडे | बिनतारी संदेश विभाग |
| २५. | पोउपनि/युवराज प्रल्हाद राठोड | पो.स्टे मुकुटबन |
| २६. | पोउपनि/ विजय शामराव मुसनवार | पो.स्टे. लोहारा |
| २७. | पोउपनि/ वनदेव नामदेव कापडे | अपर पोलीस अधिक्षक यांचे वाचक |

प्रमाणित करण्यांत येते की, वरील अधिका-यांना यापुर्वी अर्जित रजा प्रत्यार्पित करण्यांस मंजुरी प्रदान करण्यांत आलेली नाही तसेच वरील मंजुर रजेची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्यांत आलेली आहे.

वरील रजा प्रत्यार्पित करण्यांस येणारा खर्च **सन २०१९-२०२०** या वित्तिय वर्षाकरीता २०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस (००)(०१)-जिल्हा पोलीस दल-वेतन या लेखाशिर्षाखालील मंजुर अनुदानातुन भागविण्यांत येईल.

(एम. राज कुमार)
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**

प्रति,

वेतन लिपीक (अधिकारी) - २ प्रतीत

प्रत :- वरील सर्व संबधीत अधिकारी यांना माहितीस / डिपीजी लिपीक

---

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा काटकर/ 11620 /२०१९ यवतमाळ, दि. 10 OCT 2019

**आदेश**

श्रीमती के.पि.काटकर वरिष्ठ श्रेणी लिपीक हयांना त्यांचे मुलीचे लग्ना करिता **दि.१४/१०/२०१९ ते** २२/११/२०१९ **पर्यंत एकुण ३९** दिवस अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे,त्यांच्या रजेच्या कालवाधीत त्याचे कार्यसनाचा अतिरीक्त कार्यभार श्रीमती आयशा रब कश्रेली यांचे कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मायतो)**

(पि.के.गिरोलीकर)
**प्र.कार्यालय अधीक्षक**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**
**करीता**

प्रति,

१. श्रीमती के.पि.काटकर वरिष्ठ श्रेणी लिपीक पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्रीमती आयशा रब कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /का.अ /प्रलि प्रबंधक शाखा/डिपीजी लिपीक

## भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# निरंक

## भाग ४ - बक्षिस / मानधन

# निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक: डिपी/३१-बी-२/अं.आ/ तामील/पोनि-शुक्ला/ 11636 /२०१९ यवतमाळ दिनांक : 10 OCT 2019

संदर्भ :- मा. वि.पो.म.नि यांचे आदेश क्रमांक. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-शुक्ला/प्र.क.१६/२०१९/४२७२ अमरावती दि. ०५/१०/२०१९ अमरावती

विषय :- अंतिम आदेश प्रत तामील बाबत.
पोनि दिनेश शुक्ला नेमणुक पो.स्टे ~~वडगांव जंगल~~ घाटंजी

***

संदर्भाकिंत विषयान्वये प्राप्त अंतिम आदेशाची मुळे प्रत पोनि/दिनेश शुक्ला यांना अदा करण्यात येवुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र : अंतिम आदेश प्रत

(अनिलसिंह गौतम )
प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

प्रति,

पोनि/दिनेश शुक्ला नेमणुक पो.स्टे घाटंजी

मार्फत:- उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा

प्रत :- अधिकारी आस्थापना लिपीक/वेतन लिपीक-२/डिपीजी लिपीक यांना माहितीस्वत व उचित कार्यवाहीस्तव

letter

क्रमांक: अप/कक्ष-५/यवतमाळ/कसुरी/पोनि-शुक्ला/प्र.क.१६/२०१९ /4272 अमरावती दि. 05 OCT 2019

वाचा :- १) पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक स्थागुशा/गुन्हे देखरेख/२७८६/२०१७ दिनांक २९.०५.२०१७

२) या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-शुक्ला /कसुरी/२०१८/२९०३ दिनांक २७.०७.२०१८

३) पोनि दिनेश शुक्ला यांचे जा.क्र. १३६१९/२०१८ दिनांक २०.१०.२०१८ अन्वये सादर केलेला खुलासा.

--- ooo----

## आदेश

तुम्ही पोनि/दिनेश शुक्ला नेमणुक, पो.स्टे. वडगाव जंगल जि. यवतमाळ येथे कार्यरत असुन खालील प्रमाणे कसुरी केल्याचे आमचे निदर्शनास आणले आहे.

**कसुरी :-**

पोलीस निरीक्षक श्री. डि.एस. शुक्ला हे पो.स्टे. वडगांव जंगल जिल्हा यवतमाळ येथे ठाणेदार म्हणुन नेमणुकीस असतांना पो.स्टे. वडगांव जंगल येथे दि. २७.०४.२०१२ रोजी विषयांकित गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी गुन्हयाचा तपास स्वत:कडे घेवुन तपास पुर्ण तपासांती प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. सदर प्रकरण सेशन केस क्रमांक ११८/२०१२ प्रमाणे वि. अपर जिल्हा व सत्र न्यायाधिश, १ यवतमाळ यांचे कोर्टात वर्ग झाल्यानंतर प्रकरणाचे सुनावणी दरम्यान चाललेल्या खटल्याचा निकाल दिनांक २५.०१.२०१७ रोजी लागला असुन आरोपी निर्दोष सुटले आहेत.

शासन परिपत्रक क्र. डिजीपी/२०१५/प्र.क.५१/पोल-१०, दि. १७/१०/२०१५ प्रमाणे अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समीती मार्फत सदर गुन्हयाचे न्यायनिर्णयाची तपासणी केली असता, गुन्हयाचे तपासा दरम्यान श्री. डि.आर. शुक्ला पोलीस निरीक्षक, तत्कालीन ठाणेदार, पो.स्टे. वडगांव जंगल जिल्हा यवतमाळ हयांनी खालीलप्रमाणे गुन्हयाचे तपासात निष्काळजीपणा केल्याने आरोपीस निर्दोष सुटण्यास संधी मिळालयाचे कोर्टाचे न्यायनिर्णयावरुन निदर्शनात आले आहे.

१ गुन्हयाचे घटनेपुर्वी मृतक ही पाहुनणाने ग्राम सकापुर येथे बहीण सौ. सुनिता हिचे कडे मुक्कामी असतांना मृतक हिस आरोपी पतीने मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. परंतु तपासी अधिकारी हयांनी तेथील प्रत्यक्षदर्शी सौ. सुनिता आणि तिचे पती व ईतर साक्षदारांची बयाने नोंदविले नसल्याचे न्यायालयात निकालपत्रात नमुद केले आहे.

वरील प्रमाणे तपास अधिकारी श्री. डि. आर. शुक्ला पो.नि. तत्कालीन ठाणेदार पो.स्टे. वडगांव जंगल यांनी गुन्हयाचे निष्काळजीपणा केल्याने आरोपीस कोर्टातुन निर्दोष सुटण्यास संधी मिळाल्याने निदर्शनास आले आहे तरी त्यांनी केलेल्या कसुरी बाबत विभागीय कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे. अशा प्रकारे आपणा वरिष्ठांचे व या कार्यालयाकडुन दिलेल्या सुचनांचे पालन न करणे, वरिष्ठांच्या आदेश दुर्लक्षित करुन बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केल्याबाबत कसुरी.

उपरोक्त कसूरी संबधाने अपचारी यांना या कार्यालयाचे दि. २७.०७.२०१९ अन्वये **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परिणाम न करणारी) तीन (०३) वर्षाकरिता रोखण्याची शिक्षा का करण्यात येवु नये?"** याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. उपरोक्त कारणे दाखवा नोटीस संबंधाने अपचारी यांनी त्यांचे स्पष्टीकरण पोलीस अधीक्षक, यवतमाळ, यांचेमार्फतीने या कार्यालयास सादर केले. अपचारी यांचेविरुध्दचे संक्षिप्त कार्यवाहीचे कागदपत्राचे तसेच त्यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता व त्यांना दिनांक १४.०६.२०१९ रोजी आमचे समक्ष मुलाखतीत बोलाविण्यात आले असता त्यांनी समक्ष केलेले कथन संयुक्तिक व समाधानकारक वाटले नाही तरी सुध्दा त्यांच्याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करुन प्रस्तावित केलेल्या शिक्षेत अंशत: बदल करुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम सुधारणा २०१३ अधिनियमाचे कलम २५ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, **मकरंद रानडे** विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

पोनि/दिनेश शुक्ला नेमणुक, पो.स्टे. वडगाव जंगल जि. यवतमाळ यांना उक्त कसुरीसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-शुक्ला/कसुरी/२०१८/२९०३ दिनांक २७.०७.२०१८ अन्वये त्यांना **"पुढील देय वार्षीक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परिणाम न करणारी )तीन (०३) वर्षाकरीता रोखण्याची शिक्षा का करण्यात येवु - नये १"** या प्रस्तावित शिक्षेत अंशत: फेरबदल करुन **" पुढील देय वार्षीक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परिणाम न करणारी ) दोन (०२) वर्षाकरीता रोखणे "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर शिक्षेने अपचारी व्यथीत होत असल्यास हे आदेश प्राप्त झाल्याचे दिनाकापासून ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने अपील अर्ज सादर करु शकतात.

४.१०.१९

( मकरंद रानडे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोनि/दिनेश शुक्ला नेमणुक, पो.स्टे. वडगाव जंगल जि. यवतमाळ.

प्रत व मार्फत:- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- सोबत सदर आदेशाच्या ३ प्रती पाठविल्या आहेत. पोनि/दिनेश शुक्ला नेमणुक, पो.स्टे. वडगाव जंगल जि. यवतमाळ यांनी सदर आदेशाची मुळ प्रत त्यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी. व उर्वरीत प्रत आपले अभिलेखावर ठेवावी.

क्रमांक :पोअय/डीपी/३१-बी/अ.आ/तामील प्रत /सफौ-१०९४+६ / 11814 /२०१९ यवतमाळ, दि. 10 OCT 2019

**संदर्भ :-** विपोमणी यांचे पत्र क्र: अप/कक्ष-५/यवतमाळ/अं.आ/सफौ-१०९४डोंगरे+६/१९१,१७३/४२२६/२०१९ दि.०३/१०/२०१९

**विषय :-** १) पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २) पोहवा/१३९२ किसन बाबा चव्हाण, ३) पोशि/१६१६ रविंद्र कपिले ४)सेनि.सफौ-१०९४ नारायण डोंगरे ५) सेनि. पोहवा/१०३३ संभाजी गोरे ६) सेनि,पोहवा/८९९ मोतीराम पवार ७)सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यांना अपील आदेश तामील करणेबाबत.

०००

संदर्भांकित विषयामध्ये नमुद पोलीस कर्मचारी यांची प्राप्त अपील अर्ज निर्णयाच्या दोन (०२) प्रती आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपण एक (०१) प्रत सबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(अनिलसिंह गौतम)
प्र. पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

**प्रति,**

१) पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २) पोशि/१६१६ रविंद्र कपिले

**मार्फत :-** राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय,यवतमाळ

३) से.नि/१३९२ किसन बाबा चव्हाण, ४)सेनि.सफौ-१०९४ नारायण डोंगरे
५) सेनि. पोहवा/१०३३ संभाजी गोरे ६) सेनि,पोहवा/८९९ मोतीराम पवार
७)सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव

**मार्फत :-** ठाणेदार पो.स्टे.पुसद शहर

प्रत :- आस्थापना लिपीक कर्मचारी /वेतन लिपीक -१/ डिपीजी लिपीक/पेंन्शन लीपीक/ आस्था- २,३,४,५ यांना माहिती व योग्य

क्रमांक: अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+६/१९१,१७३,/२०१९/4226 अमरावती दि. 03 OCT 2019

वाचा :- १) पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण, ३) पोशि/१६१६ रविंद्र कपिले, ४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे,५)सेनि.पोहवा/१०३३ संभाजी गोरे,६) सेनि,पोहवा-८९९ मोतीराम पवार,७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यांचेविरुध्दच्या करण्यात आलेल्या विभागीय चौकशीचे कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे शिक्षेचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१-बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८

३)वर नमुद शिक्षा आदेशाविरुध्द पोना/९४० शेख नफीस शेख हबीब,पोहवा/१३९२ किसन बाबा चव्हाण, पोशि/१६१६ रविंद्र कपिले, सेनि.सफौ/१०९४नारायण डोंगरे, सेनि.पोहवा/१०३३,संभाजी गोरे, सेनि,पोहवा-८९९मोतीराम पवार, सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यांनी या कार्यालयाकडे सादर केलेले अपील अर्ज

## अपील आदेश

१)पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण, ३) पोशि/१६१६ रविंद्र कपिले, ४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे,५)सेनि.पोहवा/१०३३ संभाजी गोरे,६) सेनि,पोहवा८९९ मोतीराम पवार,७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव हे सर्व पो.स्टे. पुसद शहर येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी विभागीय चौकशी करुन शिक्षा दिलेली आहे.

**कसूरी :-**

पोलीस स्टेशन पुसद अप.नं. २६०/२००३ कलम ३०७,३५३,३४ भादंवि चा गुन्हा आरोपी इंद्रजितसिंह अनंतसिंह ठाकुर यांचे विरुध्द दिनांक २४/१०/२००३ कलम चे २०.१० वा. नोंदविण्यात आला व इंद्रजितसिंह ठाकुर यास गुन्हयात दिनांक २४/१०/२००३ चे २०.५० वा. अटक करण्यात आली अटकेपुर्वी ग्रामीण रुग्णालय, पुसद येथे त्याची वैद्यकिय तपासणी करण्यात आली असता त्याचे शरीरावर २ किरकोळ जखमा असल्याचे नमुद केले. इंद्रजितसिंहने गुन्हयाकरीता वापरलेली तलवार व फरारी आरोपी शोधण्याकरिता इंद्रजितसिंहचा दिनांक २८/१०/२००३ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला.

पोलीस कस्टडी रिमांड काळात इंद्रजितसिंह च्या दिनांक २५/१०/२००३ चे २३.३० वा. दि. २६/१०/२००३ चे १८.०० वा. व दिनांक २७/१०/२००३ चे १४.१० वा. वैद्यकिय तपासण्या करण्यात आल्या या तपासण्यामध्ये इंद्रजितसिंहचे शरिरावर नवीन जखमा नसुन त्याची एकंदरीत परिस्थिती सामान्य असलेबाबत नमुद आहे. तथापी दिनांक २७/१०/२००३ चे मध्यरात्री इंद्रजितसिंहची प्रकृती बिघडल्याने त्यास ग्रामीण रुग्णालय, पुसद येथे पाठविण्यात आले असता मानसोपचार तज्ञाचे इलाजासाठी त्यांना रेफर करण्यात आले. त्यानुसार दिनांक २८/१०/२००३ चे ००.२५ वाजता यवतमाळ करिता रवाना करण्यात आले. यवतमाळ येथे पोहचल्यावर श्री.

वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, येथील वैद्यकिय अधिका-यांनी इंद्रजितसिंहला पुन्हा तपासुन ०४.०० वा. मृत घोषीत केले. याबाबत प्रथम यवतमाळ शहर येथे अ.मृ. क्र. ००/०३ कलम १७४ फौ.प्र.सं.व नंतर पोस्टे. पुसद शहर येथे अ.मृ. क्र. ३१/०३ कलम १७४ फौ.प्र.सं. अन्वये दाखल करण्यात आला.

कार्यकारी दंडाधिकारी यवतमाळ हयांनी दिनांक २८/१०/२००३ चे १०.०० वाजता इंद्रजितसिंह यांचे अंगावर दोनपेक्षा वाढीव जखमा असल्याचे नमुद केले. इंद्रजितसिंहच्या प्रेतावर करण्यात आलेल्या पोस्टमार्टम अहवालात एकुण ०९ किरकोळ जखमा असल्याचे नमुद केले. कॉ.क्र. १९ व २० मध्ये डोक्यास व छातीवर गंभीर स्वरुपाच्या जखमांची नोंद आहे. या गंभीर जखमा कठीण व बोथट वस्तुच्या आघाताने झाल्या असुन मृत्युपुर्वी २४ तासातील असल्याचा अभिप्राय दिला आहे. डोक्यातील व छातीवरील जखमांच्या वेदनामुळेच मृत्यु या आशयाचा अभिप्राय देण्यात आला.

एकंदरीत वरील परिस्थीतीच्या आधारे इंद्रजितसिंहचा मृत्यु पोलीस कोठडीत झाला असुन मृत्युस कारणीभुत असणा-या जखमा दिनांक २७/१०/२००३ चे दुपारी १४.३० ते दिनांक २७/२८/१०/२००३ चे मध्यरात्री दरम्यान मृतकास मारहाण केल्याने झाल्याचे स्पष्ट होते.

यावरुन तुम्ही आरोपी इंद्रजितसिंह अनंतसिंह ठाकुर हयांना शस्त्र व फरारी आरोपीची माहिती मिळणेकरिता त्यांना यातना दिल्या व या यातनांमुळेच आरोपी इंद्रजितसिंह चा मृत्यु झाला असे स्पष्ट होते.

वरील घटनेवेळी तुमची स्टेशन डायरी जमादार, स्टेशन डायरी जमादार मदतनीस व ठाणा हजेरी डयुटीवर असतांना जेथे बसतात ती जागा लॉकअप समोरील हॉलमध्ये असुन लॉकअप मधील घडामोडी तुमच्या नजरेच्या टप्यात असतांना इंद्रजितसिंहच्या मृत्युस कारणीभुत होणारी मारहाण करणा-या आरोपीच्या बचावाकरीता तुम्ही सत्य लपवुन खोटी माहिती दिली यावरुन आपले विरुध्द कलम २०१ भादंवि चा गुन्हा दाखल करण्यात आला अशाप्रकारे तुम्ही अत्यंत बेजबाबदार व निष्काळजीपणा वर्तन केले आहे.

तुमच्या निष्काळजीपणामुळे मृतक इंद्रजितसिंह यांचे नातेवाईकांनी नुकसान भरपाई मिळण्याबाबत केलेल्या दाव्यामध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नुकसान भरपाई म्हणुन रु. ५,०५,०००/-(रु. पाच लाख पाच हजार फक्त) शासनास भरावे लागले. यासाठी तुम्ही स्वत: जबाबदार असल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त कसुरी प्रकरणी १)पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण, यांना सेवेतुन काढुन टाकणे (Remove from service) व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/- **रक्कमेपैकी रु. ७२,१५०/-वसुली**, ३)पोशि/१६१६ रविंद्र कपिले,यांना पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ**(भावी वेतनवाढीवर परिणामकारक)दोन(०२)वर्षाकरिता रोखणे** हि शिक्षा व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या **रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली**, ४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे,५)सेनि.पोहवा/१०३३,संभाजी गोरे, यांना म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या **निवृत्ती वेतनातुन रु. २००/- दरमहा एक वर्षाकरीता** कपात करण्याची शिक्षा व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-**रक्कमेपैकी**

रु. ७२,१५०/-वसुली, ६) सेनि,पोहवा-८९९ मोतीराम पवार, ७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यांना म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या **निवृत्ती वेतनातुन रु. २०००/- दरमहा एक वर्षाकरीता कपात** करण्याची शिक्षा व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-**रक्कमेपैकी रु. ७२,१५०**/-वसुली याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचेकडील दिनांक १६/०४/२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असता अपचारी क्रमांक १ यांनी सदर कारणे दाखवा नोटीस चे स्पष्टीकरण सादर केले नाही. व इतर ०६ कसुरदार यांनी स्पष्टीकरण सादर केलेले आहेत. सदर प्रकरणी कसुरदार क्रमांक ०१ ते ०७ यांना मौखीक म्हणेने मांडण्याकरीता दिनांक ०७/०३/२०१७ रोजी लेखी पत्र देवुन आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन मौखीक म्हणने ऐकुण घेण्यात आले. स्पष्टीकरण व समक्ष मौखीक केलेले कथन हे कर्तव्यातील कसुरीस व न्यायनिर्णयास धरुन नसल्याने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना समाधानकार वाटले नाही, म्हणुन कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत कोणतेही फेरबदल न करता कसुरदार क्रमांक ०१ ते ०७ यवतमाळ जिल्हा पोलीस दल. यांना उपरोक्त प्रकरणी प्रस्तावित केलेली शिक्षा कायम करण्यात आली. त्याबाबत त्यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र. क्र.पोअय/डिपी/३१-बी/अंआ/सफौ- १०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दिनांक २९/०१/२०१८ रोजी पारीत केले आहे.

अपीलार्थी सफौ/१०४९ नारायण डोंगरे+ ०६ यांनी सदर शिक्षेच्या आदेशविरुध्द या कार्यालयास उद्देशुन सादर केलेले अपील अर्ज मुदतीत असल्याने ते विचारार्थ घेण्यात आलेले आहेत.

१)पोना/९४० शेख नफीस शेख हबीब २)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण,३) पोशि/१६१६ रविंद्र कपिले, ४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे,५)सेनि.पोहवा/१०३३ संभाजी गोरे,६) सेनि,पोहवा-८९९ मोतीराम पवार,७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या कागदपत्रांची व अपील अर्जात त्यांनी उपस्थीत केलेल्या मुद्यांची काळजीपुर्वक छानणी केली तसेच वरील कसुरीचे संबधाने त्यांना दि. २१/०६/२०१८ रोजी आज्ञांकित कक्षात समक्ष मुलाखती करीता बोलविण्यात आले होते त्यांनी सदर प्रकरणी मौखीक केलेले कथन हे कर्तव्यातील कसुरीस व न्यायनिर्णयास धरुन नसल्याने समाधानकारक वाटले नाही. तसेच विभागीय चौकशीत त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द झालेले आहेत. अपीलार्थी यांना पोलीस अधिक्षक यांनी दिलेली शिक्षा कसुरीच्या तुलनेने योग्य असुन त्यामध्ये फेरबदल करणे उचित होणार नाही, म्हणुन मी **मकरंद रानडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती** खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश :-

१)<u>**पोना/९४० शेख नफीस शेख हबीब**</u> यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये " सेवेतुन काढुन टाकणे (Remove from service) " व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-**रक्कमेपैकी रु. ७२,१५०**/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला **अपील अर्ज फेटाळत** असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

२)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण, यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये " सेवेतुन काढुन टाकणे (Remove from service) " व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

३)पोशि/१६१६ रविंद्र कपिले, यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये " पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ(भावी वेतनवाढीवर परिणामकारक)दोन(०२)वर्षाकरिता रोखणे" व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे, यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या "निवृत्ती वेतनातुन रु. २००/- दरमहा एक वर्षाकरीता कपात " व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

५)सेनि.पोहवा/१०३३,संभाजी गोरे, यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या " निवृत्ती वेतनातुन रु. २००/- दरमहा एक वर्षाकरीता कपात" व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

६) सेनि,पोहवा-८९९ मोतीराम पवार, यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या "निवृत्ती वेतनातुन रु. २०००/- दरमहा एक वर्षाकरीता कपात " व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव यवतमाळ जिल्हा पोलीस दल पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१ बी/अंआ/सफौ-१०९४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि. २९/०१/२०१८ अन्वये

म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७(१) तरतुदी नुसार मिळणा-या " निवृत्ती वेतनातुन रु. २०००/- दरमहा एक वर्षाकरीता कपात" व मृतकाचे नातेवाईकास आर्थिक सहाय म्हणुन शासनाने भरपाई केलेल्या रु.५,०५,०००/-रक्कमेपैकी रु. ७२,१५०/- वसुली या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळ्त असुन पोलीस अधीक्षक यांनी दिलेली वरील शिक्षा कायम करण्यात येत आहे.

त्यांची इच्छा असल्यास ते हा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

30.9.19

( मकरंद रानडे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

१) पोना/९४० शेख नफीस शेख हबीब
२)पोहवा/१३९२,किसन बाबा चव्हाण,
३) पोशि/१६१६ रविंद्र कपिले, नेम. पोलीस मुख्यालय यवतमाळ
४) सेनि.सफौ/१०९४ नारायण डोंगरे, बालाजी पार्क, श्रीरामपुर, पुसद
५)सेनि.पोहवा/१०३३संभाजी गोरे, बालाजी पार्क श्रीरामपुर, पुसद
६) सेनि,पोहवा-८९९ मोतीराम पवार, बंजारा कॉलनी पुसद
७) सेनि.पोहवा/१२३३ प्रभाकर पाईकराव गांधी नगर, पुसद

प्रत व मार्फत:- पोलीस अधीक्षक, यवतमाळ

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपचारी क्रमांक ०१ ते ०७ याना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे विभागीय चौकशीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.

## भाग ६ - प्रशिक्षण व इतर

## निरंक

## समाप्त